असा. क्र. ५५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, ऑक्टोबर १४, २००५/आश्विन २२, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**—महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००५ यामध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. ४९४-४९७

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर २००५.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2005.**

AN ORDINANCE TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND (AMENDMENT) ORDINANCE, 2005.

**सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००५ यामध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२००५ चा महा. अध्या. ५. **आणि ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००५ यात सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २००५ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००५ याच्या कलम २ मध्ये, " रुपये सहाशे कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी " रुपये बाराशे कोटी इतक्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल. २००५ चा महा. अध्या. ५.

## निवेदन.

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, (१९५६ चा मुंबई ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या, राज्याच्या आकस्मिकता निधीच्या मूळ निधीची मर्यादा रुपये १५० कोटी एवढी आहे. दिनांक ११ ऑगस्ट २००५ रोजी प्रख्यापित केलेल्या, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००५ (२००५ चा महा. अध्या. ५) द्वारे तात्पुरता उपाय म्हणून, उक्त निधीची मर्यादा रुपये १५० कोटींहून रुपये ६०० कोटी इतकी वाढविण्यात आली आहे.

२. राज्यात अलिकडे झालेल्या अतिवृष्टीमुळे लोक मोठ्या संख्येने बाधित झाले असून, त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या लोकांना नुकसानभरपाई देण्यासाठी अंदाजे रुपये १४०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने या प्रयोजनासाठी १००० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. याशिवाय तातडीच्या व अकल्पित स्वरूपाच्या खर्चाच्या अन्य काही बाबींवरही खर्च करावा लागेल. अशा बाबींवरचा खर्च भागवण्यासाठी १५०० कोटी रुपये लागतील असा अंदाज आहे. खर्चाच्या या बाबी " नवीन सेवा " असतील आणि म्हणून त्या, राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. राज्य विधानमंडळाचे आगामी अधिवेशन दिनांक ५ डिसेंबर २००५ रोजी सुरू करण्याचे ठरले आहे. उपरोल्लिखित योजनांकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत पूरक मागण्या व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे, या " नवीन सेवांवरील " खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येतील. या बाबींवरील खर्च हा तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागवावा लागेल.

३. आकस्मिकता निधीची सध्याची वाढलेली मर्यादा ही फक्त रुपये ६०० कोटींची आहे. त्यापैकी, निकडीच्या स्वरूपाच्या विविध बाबींवरील खर्च भागविल्यानंतर, आकस्मिकता निधीमध्ये सध्या अदमासे रुपये ५१३.६१ कोटी एवढी रक्कम शिल्लक आहे. उपरोल्लिखित बाबींवरील खर्च आणि आकस्मिकता निधीमधून भागवणे आवश्यक असलेला, तातडीच्या आणि अन्य अकल्पित बाबींवरील खर्च भागविण्याकरिता ही शिल्लक अपुरी आहे. म्हणून, पूर्वोक्त खर्च भागविण्याकरिता, सध्याच्या रुपये ६०० कोटींच्या निधीमध्ये तात्पुरती वाढ करून, आकस्मिकता निधीची मर्यादा रुपये १२०० कोटींची करणे इष्ट वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००५ (२००५ चा महा. अध्या. ५) मध्ये सुधारणा करण्याकरिता तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ७ ऑक्टोबर २००५.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. पी. गहरोत्रा,**
शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, ऑक्टोबर १४, २००५/आश्विन २२, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Contingency Fund (Amendment) (Amendment) Ordinance, 2005 (Mah. Ord. VIII of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Contingency Fund (Amendment) (Amendment) Ordinance, 2005 (Mah. Ord. VIII of 2005), published under the authority of the Governor).

---

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 14th October 2005

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2005**

*AN ORDINANCE*

*to amend the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2005.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to amend the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2005, for the purposes hereinafter appearing;

Mah. V of 2005.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** *(1)* This Ordinance may be called the Maharashtra Contingency Fund (Amendment) (Amendment) Ordinance, 2005.

*(2)* It shall come into force at once.

Amendment of section 2 of Mah. Ord. V of 2005.

**2.** In the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2005, in section 2, for the words "a sum of six hundred crore of rupees" the words "a sum of one thousand two hundred crore of rupees" shall be substituted. Mah. V of 2005.

STATEMENT

The original corpus of the Contingency Fund of the State established and maintained under the Maharashtra Contingency Fund Act (Bom. XLVI of 1956), is one hundred fifty crore rupees. The said corpus of one hundred fifty crore rupees has been increased to rupees six hundred crore of rupees as a temporary measure by the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2005 (Mah. Ord. V of 2005), promulgated on the 11th August 2005.

2. Due to heavy rainfall in the State recently, the large number of persons have been affected very badly and the heavy losses have been occurred. To provide for compensation to the persons affected by this natural calamity fund to the tune of Rs. 1400 crore will be required. The Central Government has made available Rs. 1000 crore for this purpose. Besides, expenditure will have to be incurred on certain items of urgent and unforeseen nature. To meet the expenditure on these items, it is expected that Rs. 1500 crore will be required. These items of expenditure constitutes "New Services" and therefore, they are required to be brought to the notice of the State Legislature. The ensuing Session of the State Legislature is scheduled to commence on the 5th December 2005. Necessary orders for making available the funds for the abovementioned schemes can be issued only after the expenditure on these "New Services" is brought to the notice of the State Legislature, by way of Supplementary Demands and an Appropriation Bill, passed by both Houses of the State Legislature, is published as an Act of the State Legislature. As the expenditure on these items is required to be incurred immediately, it will have to be met by way of withdrawal of advances from the Contingency Fund.

3. The present increased corpus of the Contingency Fund is Rs. 600 crore. Out of this, at present a balance of around Rs. 513.61 crore is available in the Contingency Fund after meeting expenditure on various items of emergent nature. This balance is inadequate for the abovementioned items of expenditure and for other unforeseen and immediate items of expenditure which would be required to be met from the Contingency Fund. It is, therefore, considered expedient to increase the present corpus of the Contingency Fund temporarily from Rs. 600 crore to Rs. 1200 crore, so as to meet the expenditure as aforesaid.

4. As both Houses of the State Legislature are not in session, and immediate action is required to be taken to amend the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2005 (Mah. Ord. V of 2005) for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 7th October 2005.

S. M. KRISHNA,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

O. P. GAHROTRA,
Additional Chief Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई